**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांच्या फसवणुकीसंदर्भातल्या गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी शेतकरी न्यायालयाचा राज्य सरकारचा प्रस्ताव

- अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- ओला, उबर यासारख्या कंपन्यांना गर्दीच्या वेळेत मूलभूत प्रवासी भाड्याच्या दुपटीपर्यंत भाडे आकारण्याची केंद्र सरकारची परवानगी

**आणि**

- विदर्भात पावसाचा जोर, सिंधुदुर्गात पुरात वाहून गेल्यानं एकाचा मृत्यू

**<><><><><>**

राज्यात शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी आर्थिक गुन्हे विभाग, ईओडब्ल्यू आणि ग्राहक न्यायालयाच्या धर्तीवर शेतकरी न्यायालय उभारण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आज विधानसभेत दिली. सुधीर मुनगंटीवार यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात सोयाबीन खरेदीसाठी २ केंद्रं निश्चित केली असून तिथं सुमारे पाच हजार पाचशे कोटी रुपयांची खरेदी झाल्याची माहिती त्यांनी आज विधासभेत दिली. सोयाबीन खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्याची आवश्यकता

असल्यास सरकार याबाबत अनुकूल असल्याचं रावल म्हणाले. रोहित पवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

राज्यात वीज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी किंवा शेतमजुरांच्या कुटुंबियांना दिली जाणारी चार लाख रुपयांची मदत वाढवून ती दहा लाख रुपये करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात केली. याबाबत विचार करून मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असं आश्वासन आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिलं. विधानसभेत आज गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण आणि नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याची अशी दोन विधेयके सभागृहात मंजूर करण्यात आली.

शेतकरी आत्महत्या आणि बैलाच्या जागी स्वतः जोताला जोडण्याचा शेतकऱ्याचा प्रयत्न याविषयावर विरोधी पक्षांनी दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाकारला. या गंभीर स्थितीवर आताच चर्चा करण्याची मागणी विजय वडेट्टीवार आणि भास्कर जाधव यांनी केली, ती अध्यक्षांनी नाकारली. सरकारही चर्चेला तयार आहे, आम्हालाही शेतकऱ्यांची काळजी आहे, असं उत्तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर दिलं. मात्र याचा निषेध करत विरोधी सदस्यांनी सभात्याग केला.

विरोधी पक्षाने केलेल्या आरोपांना आज बबनराव लोणीकर यांनी सभागृहात उत्तर दिलं. आपण शेतकरी विरोधी नसून, विरोधक दावा करत असलेलं वक्तव्य आपण केलंच नाही. मात्र, तरीही आपण शेतकऱ्यांची माफी मागायला तयार आहोत, असं लोणीकर म्हणाले. लोणीकर यांच्या उत्तरावर

विरोधकांनी घोषणा दिल्या. त्यात सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांची भर पडल्याने गदारोळ होऊन कामकाज दहा मिनिटांसाठी स्थगित झालं.

<><><><><>

राज्यातल्या शाळांमध्ये पटसंख्या कमी असली तरी त्या शाळा बंद केलेल्या नाहीत, आणि यापुढेही होणार नाहीत, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिली. आमदार विक्रम काळे यांच्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते. राज्यातल्या एकंदर एक लाख, आठ हजारापेक्षा जास्त शाळांपैकी १८ हजारापेक्षा जास्त शाळांची पटसंख्या २०पेक्षा कमी आहे, मात्र यापैकी कोणतीही शाळा बंद झालेली नाही, असं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या जवळपास एक हजार शाळांमध्ये एकही शिक्षक नसून त्यांतल्या विद्यार्थ्यांचा प्रश्न महत्त्वाचा असल्याचा मुद्दा आमदार सुधाकर आडबाले यांनी उपस्थित केला. यावर, माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल, असं मंत्री भोयर यांनी सांगितलं.

राज्यातल्या ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकींसाठी वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढवण्यासाठीचं विधेयक-२०२५ विधानपरिषदेनं एकमतानं संमत केलं. ग्रामविकास आणि पंचायती राज मंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक सभागृहासमोर मांडलं.

<><><><><>

अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून यासंदर्भातलं विधेयक या अधिवेशनात आणून त्यानुसार कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत केली. आमदार परिणय फुके यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

**होल्ड बाईट- देवेंद्र फडणवीस (२४ सेकंद)**

अशा गुन्हेगारांविरुद्धचे खटले जलदगती न्यायालयात चालवण्यासाठी आवश्यक पावलं सरकार उचलत असून व्यसनमुक्ती केंद्रं उभारण्याचं कामही सुरू असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या १० वर्षात मुंबई वगळता उर्वरित राज्यात सायबर आणि डिजिटल गुन्ह्यांमधून १ कोटी गुंतवणूकदारांची २२ हजार ५२२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत या संदर्भातल्या प्रश्नावरच्या लेखी उत्तरात दिली.

**<><><><><>**

विविध वाहतूक संघटनांना संप मागे घेण्याचं आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत केलं. वाहतूकदारांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी यांच्या संयुक्त समितीचा अहवाल एका महिन्यात प्राप्त होणार असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. कोणतीही चुकीची कारवाई केली जाऊ नये, अशा सूचना पोलीस आणि परिवहन विभागाला त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी वाहतूकदार संघटनांच्या प्रतिनिधींनी संप मागे घेण्याबाबतच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला.

**<><><><><>**

ओला, उबर, रॅपिडो यासारख्या कंपन्यांना गर्दीच्या वेळेत मूलभूत प्रवासी भाड्याच्या दुपटीपर्यंत भाडे आकारण्याची परवानगी केंद्र सरकारनं दिली आहे. पूर्वी ही मर्यादा दीडपट होती. गर्दी नसलेल्या वेळेत मूलभूत प्रवासी भाड्याच्या किमान निम्मी रक्कम भाडे म्हणून या कंपन्यांना आकारता येईल. केंद्री रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं यासंदर्भातले सुधारित दिशानिर्देश प्रसिद्ध केले आहेत. येत्या ३ महिन्यात नव्या दिशानिर्देशांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना मंत्रालयानं विविध राज्यांना दिल्या आहेत. विविध वाहनांसाठी असलेल्या मूलभूत भाड्याची रक्कम राज्य सरकार निश्चित करते.

सक्षम कारणाशिवाय फेरी रद्द केली तर ग्राहकांना किंवा चालकाला एकूण भाड्याच्या रकमेच्या १० टक्के किंवा कमाल १०० रुपये दंड द्यावा लागेल.

चालकाच्या मालकीची गाडी असेल तर त्याला भाड्याच्या किमान ८० टक्के रक्कम द्यावी. कंपनीच्या मालकीची गाडी असेल तर चालकाला भाड्याच्या किमान ६० टक्के रक्कम द्यावी, असंही या दिशानिर्देशात नमूद आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातले माजी आमदार अपूर्व हिरे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते अनिल उर्फ सावकर मादनाईक, इंदापूरचे उद्योजक प्रवीण माने यांनी आज मुंबईत भाजपात प्रवेश केला.

<><><><><>

देश जगातली अग्रणी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करत असताना महिला आणि मुलांची स्थिती सुधारली नाही तर केवळ आर्थिक

प्रगतीला महत्व राहणार नाही, असं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलं. महिला आणि बालविकास विभागाच्या विविध योजनांचा विशेषत: ‘वन स्टॉप सेंटर’ आणि ‘मिशन शक्ती’ या योजनांचा त्यांनी आज राजभवनात आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

राज्यात मोसमी पावसानं पुन्हा जोर धरला असून हवामान विभागानं आज पुण्याच्या घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट तर **ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग** जिल्हे तसंच **नाशिक, सातारा आणि कोल्हापूरचा** घाटमाथा या भागांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या वैभववाडी तालुक्यात करूळ इथं पुरात वाहून गेल्यानं एका वृद्धाचा मृत्यू झाला.

**चंद्रपूर, गडचिरोली आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्यात गेल्या २४ तासात झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या-नाले ओसंडून वाहत आहेत. चंद्रपूर, गडचिरोली या दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा ब्रह्मपुरी - वडसा मार्गावरचा भूती नदीवरचा पूल वाहून गेल्यानं वाहतूक ठप्प झाली आहे.

**<><><><><>**

अँडरसन – तेंडुलकर करंडक क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बर्मिंगहॅम इथल्या एजबस्टन इथं सुरु झाला. यात इंग्लंड संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**//<><><><><>//**